राज्य योजना सन २०१९-२०२०
हक्क व विशेषाधिकार निर्धारीत करणे- राष्ट्रीय उद्याने आणि अभयारण्य परिसरातील गावांचे पुनर्वसन (२४०६-२२४१) अंतर्गत चालू बाब प्रस्ताव.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांकः डब्ल्यूएलपी-०५.१९/प्र.क्र. १५९ /फ-१
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २५ जूलै, २०१९

वाचा :-

१. वित्त विभागाचे, शासन परिपत्रक, क्रमांक :- अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक ०१.०४.२०१९.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१/पी/यो/चाबाप्र/प्र.क्र.३१/२६८/१९-२०, दिनांक :- २८.०५.२०१९.
१. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांकः डब्ल्यूएलपी-०५.१९/प्र.क्र. १५९ /फ-१, दिनांक २९.०५.२०१९.
२. वित्त विभागाचे, शासन परिपत्रक, क्रमांक :- अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक ०८.०७.२०१९.

प्रस्तावना :-

सन २०१९-२०२० मध्ये राज्यस्तरीय हक्क व विशेषाधिकार निर्धारीत करणे- राष्ट्रीय उद्याने आणि अभयारण्य परिसरातील गावांचे पुनर्वसन (२४०६-२२४१) या लेखाशिर्षांतर्गत रुपये १५००.०० लक्ष इतका नियतव्यय मंजूर व अर्थसंकल्पित करण्यात आला आहे.

२. संदर्भ क्रमांक ४ च्या परिपत्रकात **"सन २०१९-२०२० च्या अर्थसंकल्पीय तरतूदींची मासिक निधी विवरणपत्रे अर्थसंकल्प अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणालीवर (बीम्स) प्रशासकीय विभागाकडून नोंदविण्यात आल्यानंतर सन २०१९-२०२० च्या प्रथम नऊमाहीकरीता (डिसेंबर, २०१९ अखरे) आवश्यक असणारा अनिवार्य व कार्यक्रमांतर्गत खर्चाचा अर्थसंकल्पीत निधी एकूण वार्षिक तरतूदीच्या ६० टक्केच्या मर्यादेत अर्थसंकल्पीय अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणालीवर (बीम्स) वितरीत केला जाईल."** असे नमूद करण्यात आले आहे. त्या नुसार हक्क व विशेषाधिकार निर्धारीत करणे- राष्ट्रीय उद्याने आणि अभयारण्य परिसरातील गावांचे पुनर्वसन (२४०६-२२४१) या राज्य योजनांतर्गत सन २०१९-२०२० मध्ये रु. ९००.०० लक्ष निधी वितरीत करण्यास विभागास अधिकार प्रदान करण्यात आले आहे.

३. वित्त विभागाच्या संदर्भ क्रमांक १ च्या शासन परिपत्रकानुसार सन २०१९-२०२० करीता राज्य योजना हक्क व विशेषाधिकार निर्धारीत करणे- राष्ट्रीय उद्याने आणि अभयारण्य परिसरातील गावांचे पुनर्वसन (२४०६-२२४१) अंतर्गत संदर्भ क्रमांक ३ च्या शासन निर्णयानुसार रु. ५००.०० लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे. आता सदर योजनांतर्गत **(अर्थसंकल्पित निधी रु. १५००.०० वजा आतापर्यत वितरीत केलेला रु. ५००.०० लक्ष उर्वरित रु. ४००.०० लक्ष)** रु. ४००.०० लक्ष निधी वितरणासाठी शिल्लक आहे.

४. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भ क्रमांक २ च्या पत्रान्वये सन २०१९-२०२० करीता हक्क व विशेषाधिकार निर्धारीत करणे- राष्ट्रीय उद्याने आणि अभयारण्य परिसरातील गावांचे पुनर्वसन (२४०६-२२४१) या योजनेतर्गत रु. २३५०.५८ लक्षचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर केला आहे. त्या अनुषंगाने शासनाने पुढील निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :-

प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी सादर केलेले प्रस्ताव व हक्क व विशेषाधिकार निर्धारीत करणे- राष्ट्रीय उद्याने आणि अभयारण्य परिसरातील गावांचे पुनर्वसन (२४०६-२२४१) या योजने अंतर्गत उपलब्ध निधीच्या अनुषंगाने सदर शासन निर्णयान्वये मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील गावांचे पुनर्वसनाकरिता खालील अटींच्या अधीन राहून **रुपये ४००.०० लक्षच्या प्रस्तावास** शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

I. सदर निधीसाठी नियंत्रण अधिकारी प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर हे राहतील. त्यांचेकडे हा निधी सुपूर्द करण्यात येत आहे. त्यांनी या योजनेअंतर्गत घावयाच्या कामांची अंमलबजावणी, कृती आराखड्याप्रामाणे, विहीत कार्यपध्दतीनुसार आणि ठरविलेलया मुदतील करण्याबाबत दक्षता घ्यावी. याबाबत सविस्तर मार्गदर्शक सुचना क्षेत्रीय अधिकाऱ्यांना द्याव्यात आणि अंमलबजावणीबाबत वेळोवेळी आढावा घ्यावा. मंजूर निधीपैक्षा जास्त खर्च होणार नाही याची नियंत्रण अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी.

II. प्रस्तावीत खर्चः- लेखाशिर्ष २४०६ वनीकरण व वन्यजीवन, ०२ पर्यावरणीय वनीकरण व वन्यजीवन, ११० वन्यजीव संरक्षण (००) (११) हक्क व विशेषाधिकार निर्धारीत करणे- राष्ट्रीय उद्याने आणि अभयारण्य परिसरातील गावांचे पुनर्वसन (राज्य) (२४०६-२२४१) या लेखाशिर्षाखाली सन २०१९-२०२० मध्ये अर्थसंकल्प वितरण प्रणालीद्वारे उपलब्ध होणा-या अनुदानातून आणि सोबत जोडलेल्या विवरणपत्रानुसार खर्च करण्यात यावा.

III. योजनांतर्गत प्रस्तावीत कार्यबाबींना आवश्यकतेनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांनी प्रशासकीय व तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे याची खातरजमा झाल्यानंतरच सदर कार्यबाबींवर निधी खर्ची टाकण्यात यावा.

IV. वितरीत केलेला निधी शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार योजनेस विहीत केलेल्या मर्यादेत, प्रचलित नियमांच्या अधीन राहून, प्रचलित धोरण व वित्त विभागाने वेळोवेळी विहीत केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार तसेच प्रस्तावात नमूद केलेल्या कार्यबाबींच्या अनुषंगाने खर्च करण्यात यावा.

V. सदरच्या खर्चाच्या अनुषंगाने आवश्यक असलेले लेखे व्यवस्थित/अचूक ठेवण्याबाबत दक्षता घ्यावी.

VI. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी शासन मान्यतेसाठी सादर केलेल्या प्रस्तावातील बाबींची निकड लक्षात घेवनू

अर्थसंकल्प अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणालीवर (बीम्स) वर उपलब्ध निधीच्या मार्यादेत निधी वाटप करावा.

VII. कार्यबाबींमध्ये खरेदीचा समावेश असल्यास शासनाने विहित केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन खरेदी करण्यात यावी.

VIII. वित्त विभागाने निर्गमित केलेल्या विविध मार्गदर्शन सूचनांचे व वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक विअप्र-२०१३/प्र.क्र. ३०/२०१३/विनियम, भाग-२, दिनांक :- १७.०४.२०१५, क्रमांक :- अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक ०१.०४.२०१९ व दिनांक ०८.०७.२०१९ च्या परिपत्रकाचे काटेकोर पालन करावे.

IX. शासन निर्णय महसूल व वनविभाग, क्रमांक डब्ल्यूएलपी-१०१२/प्र.क्र.१२२/फ-१, दिनांक ३/११/२०१२, शासन निर्णय महसूल व वनविभाग, क्रमांक डब्ल्यूएलपी-०७१४/प्र.क्र.१६७/फ-१, दिनांक १२/१०/२०१५, शासन निर्णय, महसूल व वनविभाग, क्रमांक डब्ल्यूएलपी-०४१७/प्र.क्र.१०४/फ-१, दिनांक १०/०१/२०१८ व शासन निर्णय क्र.डब्ल्यूएलपी-०११९ /प्र.क्र.१६ /फ-१, दिनांक ६/०३/२०१९ या प्रमाणे लाभार्थी पात्र असल्याची खात्री करुनच प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी निधी वितरीत करावा.

२. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक ०१.०४.२०१९ व दिनांक ०८.०७.२०१९ ला अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७२५१६४७०३७८१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SWAPNIL DESHBHRATAR

Digitally signed by SWAPNIL DESHBHRATAR
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=9add558653210cf44615291102f1bf143783e8403be64c06c7928e692d77c386, postalCode=400037, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=ce420aedd83773a67f861ab4c751835b3c5119f8fc41f2f3aa39bd7749dc02e0, ou=FOREST DEPARTMENT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SWAPNIL DESHBHRATAR
Date: 2019.07.25 16:54:27 +05'30'

(स्वप्निल देशभ्रतार)
विशेष कार्य अधिकारी,
महसूल व वन विभाग

प्रत,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती.
५. महालेखापाल१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखापरिक्षण), मुंबई/नागपूर.
६. ब-१, फ-२,फ-१ कार्यासन (निवडनस्ती), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.